08 FEB 2025

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# खतांचा नियंत्रित वापर, सेंद्रिय शेतीला चालना आवश्यक

## शिरोळ तालुक्यातील भूजल, मातीच्या आरोग्यावर चर्चा : विद्यापीठात जनसहभागीय जलजागरण

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ७ : शिरोळ तालुक्यातील नांदणी, टाकळीवाडी, मौजे आगार या गावांतील भूजलाची गुणवत्ता, मातीच्या आरोग्यावर होणाऱ्या परिणामांवर आज शिवाजी विद्यापीठातील जनसहभागीय जलजागरण कार्यशाळेत चर्चा करण्यात आली. त्यात संबंधित गावांमध्ये खतांचा नियंत्रित वापर आणि सेंद्रिय शेतीला चालना देणे आवश्यक असून, त्यादृष्टीने कार्यवाही लवकर सुरू करणे आवश्यक असल्याचा सूर व्यक्त झाला.

विद्यापीठातील नीलांबरी सभागृहात फ्रँक वॉटर (इंग्लंड), अॅक्वाडॅम, सेवावर्धिनी (पुणे) या संस्था आणि शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र अधिविभागातर्फे कार्यशाळा घेण्यात आली. त्याचे उद्घाटन प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी फ्रँक वॉटरच्या सीईओ केटी अल्कॉट, 'अॅक्वाडॅम'च्या डॉ. उमा असलेकर, विद्यापीठाच्या पर्यावरण विभागाच्या प्रमुख डॉ. आसावरी जाधव प्रमुख उपस्थित होत्या.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील जनसहभागीय जलजागरण कार्यशाळेत प्र-कुलगुरु डॉ. पी. एस. पाटील यांच्यासह आसावरी जाधव, सोमदत्त पटवर्धन, केटी अल्कॉट, उमा असलेकर, विक्रम पंडित सहभागी झाले.

'भूजल संवर्धन, प्रदूषण रोखण्यासाठी शाश्वत विकासातून पर्याय काढता येईल. शिरोळ तालुक्यातील भूजल, मातीच्या सर्वेक्षणासाठी विद्यापीठ मदत करेल, असे प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांनी सांगितले. 'भूजलाची सध्याची परिस्थिती विविध घटकांमुळे अधिक गुंतागुंतीची झाली आहे. ती सुधारण्यासाठी संशोधन, स्थानिक रहिवासी, शैक्षणिक आणि स्वयंसेवी संस्थांच्या एकत्रित प्रयत्नाने करता येईल', असे केटी अल्कॉट यांनी सांगितले. डॉ. जाधव यांनी भूजल संवर्धनाबाबत काही सूचना केल्या. डॉ. असलेकर यांनी नांदणी, टाकळीवाडी, मौजे आगारमधील भूजल, मातीबाबतचे सर्वेक्षण सुरू असल्याची माहिती दिली. यावेळी 'अॅक्वाडॅम'चे आदित्य जाधव, डॉ. कांचन खरे, 'सेवावर्धिनी'चे सोमदत्त पटवर्धन, आदी उपस्थित होते. प्रसाद देशपांडे यांनी स्वागत केले. विद्यागौरी कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले. विक्रम पंडित यांनी आभार मानले.

### ■ ठोस पावले उचलण्याची वेळ

दत्त सहकारी शेतकरी साखर कारखान्याचे मार्गदर्शक संचालक गणपतराव पाटील यांनी शिरोळ तालुक्यामधील क्षारपड जमिनी उत्पादक केल्याची माहिती दिली. या तालुक्यातील भाजीपाल्याबाबत व्यक्त होणारी भीती दूर करण्यासाठी पाणी, मातीचे सर्वेक्षण करून वास्तव सर्वांसमोर मांडण्याची मागणी काही शेतकऱ्यांनी केली.

सेंद्रिय शेती आणि पाण्याच्या गुणवत्तेसंबंधी जनजागृती वाढवून ठोस पावले उचलण्याची ही वेळ असल्याचे मत तज्ज्ञांनी व्यक्त केले. या कार्यशाळेतील निष्कर्ष आणि उपाययोजना पुढील टप्प्यात जुलैमध्ये धोरणात्मक पातळीवर मांडल्या जाणार आहेत.

### जलजागरणातील शिफारशी ...

- शेतकऱ्यांमध्ये रासायनिक खतांच्या वापराबाबत अधिक जनजागृती व्हावी.
- पाणी, मृदा प्रदूषणाचे दुष्परिणाम सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी व्यापक प्रयत्न करावेत.
- सेंद्रिय शेतीकडे वळण्याची प्रक्रिया सुरू करावी.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
08 FEB 2025
सकाळ



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ परिसराच्या पूर्व आणि पश्चिम भागास जोडणारा भुयारी मार्ग उद्या, शनिवारपासून खुला होणार आहे.

# विद्यापीठाचा भुयारी मार्ग आजपासून होणार खुला

## मंत्री चंद्रकांत पाटील करणार उद्‌घाटन

कोल्हापूर, ता. ७ : शिवाजी विद्यापीठ परिसराच्या पूर्व आणि पश्चिम भागास जोडणाऱ्या भुयारी मार्गाचे उद्‌घाटन उद्या, शनिवारी (ता. ८) सकाळी साडेदहा वाजता उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते होणार आहे.

विद्यापीठातील विद्यार्थी, पालक, शिक्षक, नागरिक तसेच अभ्यागत असे सुमारे दोन ते तीन हजार व्यक्तींची मुख्य रस्त्यावरून रोज ये-जा असते. विद्यापीठास विभागणारा हा रस्ता द्रुतगतीचा असल्यामुळे पुणे-बंगळूर एक्स्प्रेस-वेवरून कोल्हापूर शहरात येणाऱ्या व जाणाऱ्या जलदगती वाहनांच्या सातत्याने वाढत्या वर्दळीमुळे विद्यापीठाच्या पूर्व बाजूकडून पश्चिम बाजूकडे ये-जा करणाऱ्या विद्यार्थी व शिक्षक वर्गासाठी संबंधित रस्ता असुरक्षित बनला होता. त्यावर विद्यापीठाने भुयारी मार्ग व सर्व्हिस रस्ता बांधण्यासाठी विद्यापीठाने शासनाकडे आठ कोटी ४८ लाख रुपयांचा प्रस्ताव सादर केला. त्याला शासनाने फेब्रुवारी २०२३ मध्ये मान्यता दिली होती.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
08 FEB 2025
लोकमत



# विद्यापीठात भुयारी मार्गाचे आज उद्घाटन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ परिसराच्या पूर्व आणि पश्चिम भागास जोडणाऱ्या भुयारी मार्गाचे उद्घाटन आज, शनिवारी सकाळी १०.३० वाजता उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते होणार आहे. विद्यापीठाची मुख्य इमारत आणि समोरच्या रस्त्यापलीकडील विभाग यांना जोडणाऱ्या भुयारी मार्गासाठी ८ कोटी ४८ लाख रुपये मंजूर करण्यात आले होते. या निधीतून हे काम करण्यात आले. या उद्घाटन समारंभास सर्वांनी उपस्थित राहावे, असे आवाहन कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
08 FEB 2025
सकाळ

# जयसिंगपुरात आजपासून शेतकरी साहित्य संमेलन

जयसिंगपूर, ता. ७ : शेती अर्थ प्रबोधिनी, शरद कृषी महाविद्यालय, यड्रावकर शिक्षण व उद्योग समूह जयसिंगपूर यांच्या संयुक्त विद्यमाने ८ आणि ९ फेब्रुवारी रोजी दोनदिवसीय बारावे अखिल भारतीय मराठी शेतकरी साहित्य संमेलन होत आहे. सहकार महर्षी शामराव पाटील-यड्रावकर नाट्यगृहात संमेलन होणार असल्याची माहिती, स्वागताध्यक्ष आमदार राजेंद्र पाटील-यड्रावकर यांनी पत्रकार परिषदेत दिली. संमेलनाचे उद्घाटक ॲड. वामनराव चटप असून, माजी आमदार सरोजताई काशीकर संमेलनाच्या अध्यक्ष असतील.

संमेलनाच्या पहिल्या दिवशी शनिवारी सकाळी साडेनऊ वाजता ग्रंथ दिंडीने संमेलनाची सुरुवात होणार आहे. त्यानंतर ॲड. चटप यांच्या हस्ते संमेलनाचे उद्घाटन होणार आहे. दुपारच्या सत्रात 'पश्चिम महाराष्ट्राची शेतीतंत्र आणि मंत्र' या विषयावर परिसंवाद होणार आहे. डॉ. राजेंद्र कुंभार, डॉ. वसंतराव जुगळे, डॉ. जालंदर पाटील यांचा सहभाग असणार आहे. अध्यक्ष म्हणून शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन शिंदे उपस्थित राहणार आहेत.

तिसऱ्या सत्रांत दुपारी गंगाधर मोठे यांच्या अध्यक्षतेखाली शेतकरी कवी संमेलन होणार आहे. सूत्रसंचालन अजित सपकाळ व अनंत मुंडे करणार आहेत. सायंकाळच्या चौथ्या सत्रांत 'शेतीला वारंवार कर्जमुक्ती कशाला हवी?' या परिसंवादात शैलजाताई देशपांडे, सीमा नरोडे, डॉ. आदिनाथ ताकटे मार्गदर्शन करणार आहेत. अध्यक्षस्थानी अनिल घनवट उपस्थित राहणार आहेत.

रावसाहेब पुजारी यांच्या अध्यक्षतेखाली 'शेतीचा एकच आधारस्तंभ : फक्त चौथा स्तंभ' या विषयावर परिसंवाद होणार आहे. यामध्ये राजकुमार चौगुले, ज्ञानेश उगले सहभागी होणार आहेत. गंगाधर मुटे यांचे बीजभाषण होणार आहे.


08 FEB 2025
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# बापट यांच्या स्वरांनी मैफलीत रंग

## गोराणेंच्या तबला वादनाने रसिकांचा ठाव; शाहू संगीत रजनीची सांगता

■ सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. ७ : नजाकती आणि तयारीने तबला वादन करत आळंदी (पुणे) येथील सोहम गोराणे यांनी राजर्षी शाहू संगीत रजनीच्या दुसऱ्या दिवसाची मैफल आज सुरू केली. त्यांनी रसिकांना खिळवून ठेवले. ग्वाल्हेर-आग्रा घराण्याचे प्रसिद्ध शास्त्रीय गायक पंडित सुरेश बापट (मुंबई) यांच्या बहारदार आणि सुरेल गायनाने या मैफलीची सांगता झाली.**





कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातर्फे आयोजित राजर्षी शाहू संगीत रजनीमध्ये शुक्रवारी शास्त्रीय गायक पंडित सुरेश बापट यांनी बहारदार गायन केले. दुसऱ्या छायाचित्रात नजाकती आणि तयारीने तबला वादन करत आळंदी येथील सोहम गोराणे यांनी रसिकांना खिळवून ठेवले. (नितीन जाधव : सकाळ छायाचित्रसेवा)

शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागातर्फे पेटाळा येथील राम गणेश गडकरी सभागृहात गुरुवारपासून या संगीत रजनीची सुरुवात झाली. त्याच्या दुसऱ्या दिवशी आज पहिल्या सत्रात प्रसिद्ध तबला वादक पंडित योगेश समसी यांचे शिष्य सोहम गोराणे यांचे एकल तबला वादन झाले. त्यांनी सुरुवातीला ताल तीनताल सादर केला. त्यामध्ये पेशकार, कायदा, रेला, आदी रचना सादर केल्या. त्यांना स्वानंद राजोपाध्ये (सातारा) यांनी अतिशय समर्पक नगमा साथ केली. दुसऱ्या सत्रात पंडित सुरेश बापट यांनी रागेश्रीमध्ये एकतालात पारंपरिक ख्याल सादर करत गायनाला सुरुवात केली. त्यानंतर तिलक कामोद रागातील 'सूर संगत' ही रचना आणि द्रुत बंदिश, राग सुहामधील बंदिश सादर केली. तबला वादक महेश देसाई यांनी समर्पक तबला साथसंगत, तर हार्मोनियमची साथसंगत स्वलप दिवाण यांनी केली.

या मैफिलीला संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाचे प्रभारी प्रमुख डॉ. विनोद ठाकूर-देसाई, पंडित विनोद डिग्रजकर, अरुण कुलकर्णी, सचिन राजोपाध्ये, केदार वैशंपायन, नितीन मुनीश्वर, आदी उपस्थित होते. मनीष आपटे यांनी निवेदन केले.

08 FEB 2025

जनसंपर्क कक्ष

सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# श्याम बेनेगल यांची नायिका व्यवस्थेला प्रश्न विचारणारी

## डॉ. चंद्रकांत लंगरे : विद्यापीठातील स्त्री अभ्यास केंद्रात कार्यशाळा



कोल्हापूर : चर्चासत्राच्या उद्‌घाटनप्रसंगी बोलताना डॉ. चंद्रकांत लंगरे. यावेळी डावीकडून डॉ. विश्राम ढोले, निशा मुडे-पवार.

कोल्हापूर, ता. ७ : 'ज्येष्ठ दिग्दर्शक श्याम बेनेगल यांच्या समग्र चित्रपटांतून पुरुषसत्ताक व्यवस्थेला प्रश्न विचारणारी नायिका प्रखरतेने दिसते', असे प्रतिपादन ज्येष्ठ चित्रपट अभ्यासक डॉ. चंद्रकांत लंगरे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या स्त्री अभ्यास केंद्रांतर्गत आयोजित 'दिग्दर्शक श्याम बेनेगल यांच्या चित्रपटातील महिला प्रतिमा' या दोनदिवसीय राज्यस्तरीय चर्चासत्राच्या उद्‌घाटनप्रसंगी ते बीजभाषक म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी पुणे विद्यापीठाच्या संवादशास्त्र विभागाचे डॉ. विश्राम ढोले होते.

डॉ. लंगरे म्हणाले, 'बेनेगल यांच्या चित्रपटांतील महिलांच्या व्यक्तिरेखा विचार करण्यास प्रवृत्त करणाऱ्या असून, स्त्री समस्या त्यांनी स्त्रियांच्याच दृष्टिकोनातून मांडल्या. या चित्रपटांतील महिला व्यक्तिरेखा या आपल्या समस्यांची उत्तरे शोधणाऱ्या खऱ्या 'नायिका' असून, त्यामुळेच त्या आजच्या काळाशी सुसंगत वाटतात.'

डॉ. ढोले म्हणाले, 'श्याम बेनेगल यांचे चित्रपट म्हणजे व्यावसायिक व समांतर अशा दोन प्रवाहांना जोडणारा महत्त्वाचा दुवा आहे. व्यावसायिक व वास्तविक सिनेमांचा सुंदर मिलाफ त्यांनी कल्पकतेने साकार केला.' स्त्री अभ्यास केंद्राच्या संचालक डॉ. निशा मुडे-पवार यांनी प्रास्ताविक केले. चित्रपट समीक्षक सर्फराज मुल्ला यांनी मार्गदर्शन केले. यावेळी डॉ. राजेंद्र गोणारकर, विशाखा गारखेडकर, प्रसाद ठाकूर, चेतना सोनकांबळे, शिवाजी जाधव, चंद्रशेखर वानखेडे, अंबादास भासके, नितीन रणदिवे, विठ्ठल एडके, दिग्विजय कुंभार, रोहिणी साळुंखे, शैलेश कोरे, विजय जाधव उपस्थित होते. अश्विनी कांबळे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
08 FEB 2025
सकाळ



**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात झालेल्या आंतरविभागीय बेसबॉल स्पर्धेत विजेतेपद पटकावलेल्या महावीर महाविद्यालयाच्या संघासोबत प्रभारी प्राचार्या डॉ. उषा पाटील, प्रा. डॉ. रोहित पाटील उपस्थित होते.

# महावीर महाविद्यालय बेसबॉल स्पर्धेत विजेते

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ७ : शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय बेसबॉल स्पर्धेत महावीर महाविद्यालयाने कऱ्हाडच्या यशवंतराव चव्हाण विज्ञान महाविद्यालयाचा पराभव करीत विजेतेपद पटकाविले.

शिवाजी विद्यापीठात झालेल्या या स्पर्धेत कोल्हापूरसह सातारा, सांगली जिल्ह्यांतील संघांमध्ये ही स्पर्धा रंगली. अंतिम सामन्यात महावीर महाविद्यालयाने यशवंतराव चव्हाण विज्ञान महाविद्यालयाचा एकतर्फी पराभव केला. विजेत्या संघाला संस्थेचे अध्यक्ष ॲड. के. ए. कापसे, सचिव मोहन गरगटे यांचे प्रोत्साहन, तर प्रभारी प्राचार्य डॉ. उषा पाटील, जिमखानाप्रमुख डॉ. रोहित पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 8 FEB 2025

तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठाच्या भुयारी मार्गाचे आज उद्घाटन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ परिसराच्या पूर्व आणि पश्चिम भागास जोडणाऱ्या भुयारी मार्गाचा उद्घाटन समारंभ आज, शनिवारी होणार आहे. सकाळी १०.३० वाजता उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते हा समारंभ होणार आहे. यावेळी सर्वांनी उपस्थित राहावे, असे आवाहन कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
08 FEB 2025
पुढारी

# मानवी संस्कृतीच्या विविध रूपांचा आदर करणे आवश्यक

## डॉ. पानसरे; विदेशी भाषा विभाग कार्निव्हलचा समारोप

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

जगामध्ये अनेक संस्कृती आहेत. त्या मानवी संस्कृतीच्या विविध रूपांचा माणूस म्हणून आदर करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या विदेशी भाषा अधिविभागप्रमुख डॉ. मेघा पानसरे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या विदेशी भाषा अधिविभागातर्फे विविध देशांच्या कलांचे दर्शन घडविणाऱ्या 'कार्निव्हल-२०२५' या कला-सांस्कृतिक महोत्सवाच्या सांगता समारंभप्रसंगी त्या बोलत होत्या.

डॉ. पानसरे म्हणाल्या, जगामध्ये स्थलांतर होत असतात, मानवी समूह एकमेकांमध्ये मिसळत असतात. त्यावेळी या विदेशी भाषांचा चांगला उपयोग होतो. शिक्षणासाठी, व्यवसायासाठी, नोकरीसाठी परदेशात जाणाऱ्यांना या विदेशी भाषा अवगत असणे खूप महत्त्वाचे असते. विदेशी भाषा शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी भाषेचा सातत्याने सराव केल्यास ती जागतिक भाषा आणि त्या देशातील संस्कृती कायम स्मरणात राहते. यावेळी विदेशी भाषेमध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

निधी सावर्डेकर यांच्या जर्मन सोलोवर आधारित भरतनाट्य नृत्याने कार्यक्रमाची सुरुवात झाली. जपान, जर्मनी, रशिया आणि पोर्तुगीज देशांचे सोलो गाणे, कविता, समूहगीते, कथा-कथन, नाटक अशा बहारदार विविधांगी एकोणीस कार्यक्रमांचे दर्शन विदेशी भाषा अधिविभागाच्या विद्यार्थ्यांनी घडविले. कार्यक्रमास उपस्थित विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

राजवर्धन पाटील व निधी सावर्डेकर यांनी सूत्रसंचालन केले. ऐश्वर्या चव्हाण यांनी आभार मानले. यावेळी ज्योती पाटील, प्रियांका माळकर, गीतांजली शहा, स्नेहल शेटे, डॉ.अनिल घुले आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
08 FEB 2025

लोकमत

# मानवी संस्कृतींच्या रूपांचा माणूस म्हणून आदर करा

## मेघा पानसरे : विद्यापीठात 'कार्निव्हल'ची सांगता

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** जगामध्ये अनेक संस्कृती आहेत. त्या मानवी संस्कृतींच्या विविध रूपांचा माणूस म्हणून आदर केला पाहिजे. विदेशी भाषा आत्मसात करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हे खूप महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या विदेशी भाषा अधिविभागप्रमुख डॉ. मेघा पानसरे यांनी गुरुवारी केले. विदेशी भाषा अधिविभागातर्फे विविध देशांच्या कलांचे दर्शन घडविणाऱ्या 'कार्निव्हल-२०२५' या कला-सांस्कृतिक महोत्सवाच्या सांगता समारंभामध्ये त्या बोलत होत्या.

डॉ. पानसरे म्हणाल्या, जगामध्ये स्थलांतर होत असते. मानवी समूह एकमेकांमध्ये मिसळत असतात. त्यावेळी या विदेशी भाषांचा चांगला उपयोग होतो. शिक्षणासाठी, व्यवसायासाठी, नोकरीसाठी परदेशात जाणाऱ्यांना या विदेशी भाषा अवगत असणे खूप महत्त्वाचे असते. यावेळी निधी सावर्डेकर यांच्या जर्मन सोलोवर आधारित भरतनाट्यम् या नृत्याने कार्यक्रमाची सुरुवात झाली. जपान, जर्मनी, रशिया आणि पोर्तुगीज देशांचे सोलो गाणे, कविता, समूहगीते, कथा-कथन, नाटक अशा बहारदार विविधांगी १९

विदेशी भाषा अधिविभागाच्या विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाचे दर्शन घडविले. कार्यक्रमास उपस्थित विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

राजवर्धन पाटील आणि निधी सावर्डेकर यांनी सूत्रसंचालन केले. ऐश्वर्या चव्हाण यांनी आभार मानले. याप्रसंगी ज्योती पाटील, प्रियांका माळकर, गीतांजली शहा, स्नेहल शेटे, डॉ. अनिल घुले उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
08 FEB 2025
पुढारी

# विद्यापीठात विधी अधिविभागामधील कायदेविषयक कार्यशाळेस प्रतिसाद

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या विधी अधिविभामध्ये प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियान (पीएम-उषा) योजनेंतर्गत 'व्हॅल्यू ॲडिड ऑन ज्युडिशिअल एक्झामिनेशन ट्रेनिंग' विषयावर कार्यशाळा झाली. कार्यक्रमाचे उद्घाटन न्यायाधीश शरद दिगंबर मडके यांच्या हस्ते व प्रा. डॉ. एम. एस. देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली झाले.

पहिल्या सत्रामध्ये न्यायाधीश मडके यांनी न्यायाधीश व इतर परीक्षांची तयारी करण्यासाठी अनेक उपाययोजना सांगितल्या. त्यांनी न्यायाधीश होण्यासाठी पात्रतेपासून ते परीक्षेचे अनेक टप्पे यशस्वीपणे पार कसे करावे यासंदर्भात मार्गदर्शन केले.

दुसऱ्या सत्रात ॲड. सूर्यकांत मिरजे यांनी भारतीय साक्ष अधिनियम कायद्याबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तिसऱ्या सत्रात न्यायाधीश एस. पी. कुलकर्णी यांनी न्यायाधीशांसंदर्भात आपले अनुभव विद्यार्थ्यांना सांगितले.

वरिष्ठ फौजदारी वकील गिरीश नाईक यांनी अनुभवलेले फौजदारी दावे याबद्दल मार्गदर्शन केले. समारोप सत्रात काही विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
08 FEB 2025
तरुण भारत

# विधी अधिविभागप्रमुखपदी डॉ. विवेक धूपदाळे



**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या विधी अधिविभागाच्या विभागप्रमुखपदी डॉ. विवेक धूपदाळे यांची नियुक्ती करण्यात आली. या नियुक्तीचे पत्र कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या आदेशानुसार डॉ. धूपदाळे यांना देण्यात आले. या निवडीबद्दल डॉ. धूपदाळे यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
08 FEB 2025
लोकमत



कोल्हापुरातील डेक्कन कॉलेज ऑफ इंटेरिअर डिझाईन महाविद्यालच्या वार्षिक स्नेहसंमेलनप्रसंगी डॉ. मेघा गुळवणी यांच्या हस्ते दीपप्रज्वलन झाले.

# 'डेक्कन'चे स्नेहसंमेलन उत्साहात

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** डेक्कन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी संस्थेच्या डेक्कन कॉलेज ऑफ इंटेरिअर डिझाईन महाविद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन छत्रपती राजर्षी शाहू स्मारक भवन येथे पार पडले. शिवाजी विद्यापीठाच्या आयडीएस विभागाच्या अधिष्ठाता डॉ. मेघा गुळवणी उपस्थित प्रमुख पाहुणे होत्या. कविता गगराणी, करण गायकवाड परीक्षक होते.

डॉ. गुळवणी यांच्या हस्ते दीपप्रज्वलन झाले. प्राचार्या सीमा मालानी, संस्थेचे चेअरमन निरंजन वायचळ यांची भाषणे झाली. यामध्ये महाविद्यालयातील अभ्यासक्रम, विद्यार्थ्यांना मिळालेले पारितोषिक, पुरस्कार, प्लेसमेंट व पुढील वाटचाल याबाबत माहिती दिली. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रमोद बेरी यांना पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचा सत्कार झाला.

विद्यार्थ्यांनी चांगल्या पद्धतीने कलाप्रदर्शन सादर केले. कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष, विश्वस्त, प्राचार्य, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, पालक व प्रेक्षक उपस्थित होते. (वा.प्र.)

08 FEB 2025

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# रावसाहेब बोराडे यांना जीवनगौरव पुरस्कार

## शासनाचे पुरस्कार जाहीर : डॉ. प्रकाश पवार, एकनाथ पाटील यांचा समावेश

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** राज्य सरकारच्या मराठी भाषा विभागांतर्गत दिले जाणारे वाङ्मय पुरस्कार शुक्रवारी जाहीर करण्यात आले. २०२४ वर्षाचा विंदा करंदीकर जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ साहित्यिक रा.रं. बोराडे (रावसाहेब रंगराव बोराडे) यांना जाहीर झाला आहे. नामवंत प्रकाशन संस्थेसाठी २०२४ चा श्री.पु. भागवत पुरस्कार हा ज्योत्स्ना प्रकाशन, पुणे यांना, तर डॉ. अशोक केळकर भाषा अभ्यासक पुरस्कार डॉ. रमेश सीताराम सूर्यवंशी यांना आणि श्री. मंगेश पाडगावकर भाषा संवर्धन पुरस्कार हा श्रीमती भीमाबाई जोंधळे यांना जाहीर झाला आहे. एकनाथ पाटील, डॉ. प्रकाश पवार यांचाही पुरस्कार विजेत्यांमध्ये समावेश आहे.

मराठी भाषामंत्री उदय सामंत यांनी पत्रकार परिषदेत ही घोषणा केली. मानपत्र, सन्मानचिन्ह आणि रुपये १० लाख, असे विंदा करंदीकर जीवनगौरव पुरस्काराचे स्वरूप आहे. नामवंत प्रकाशन संस्था पुरस्कार ५ लाख, तर भाषा अभ्यासक आणि भाषा संवर्धन पुरस्कारासाठी २ लाख रुपये रोख, असे स्वरूप आहे.



डॉ. प्रकाश पवार



एकनाथ पाटील

हे पुरस्कार राज्य शासनामार्फत मराठी भाषेतील दिग्गज साहित्यिकांना देण्यात येतात. या पार्श्वभूमीवर यंदापासून हे पुरस्कार गेट वे ऑफ इंडियासमोर दिमाखदार सोहळ्यात २७ फेब्रुवारी रोजी देण्यात येणार आहेत.

या सोहळ्याला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार उपस्थित राहणार आहेत. नामवंत साहित्यिकांच्या समित्यांनी या पुरस्कारांची निवड केली असल्याचे सामंत यांनी सांगितले.

ग्रामीण साहित्यासाठी २०२३ चे पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. यात वाङ्मय पुरस्कार प्रकार - प्रौढ वाङ्मय अंतर्गत काव्य प्रकारात कवी केशवसुत पुरस्कार हा एकनाथ पाटील यांना 'अनिष्ठकाळाचे भयसूचन' या काव्यसंग्रहासाठी जाहीर करण्यात आला आहे. प्रौढ वाङ्मय इतिहासाकरिता शाहू महाराज पुरस्कार हा डॉ. प्रकाश पवार (राजमाता जिजाऊ : सकल जनवादी क्रांतीच्या शिल्पकार) यांना जाहीर झाला आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
08 FEB 2025

लोकमत

# बेनेगलांची नायिका पुरुषसत्ताक व्यवस्थेला प्रश्न विचारणारी

## डॉ. चंद्रकांत लंगरे : विद्यापीठात चर्चासत्राचे उद्घाटन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** ज्येष्ठ दिग्दर्शक श्याम बेनेगल यांच्या समग्र चित्रपटांतून पुरुषसत्ताक व्यवस्थेला प्रश्न विचारणारी नायिका प्रखरतेने दिसते, असे प्रतिपादन ज्येष्ठ चित्रपट अभ्यासक डॉ. चंद्रकांत लंगरे यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या स्त्री अभ्यास केंद्रांतर्गत आयोजित 'दिग्दर्शक श्याम बेनेगल यांच्या चित्रपटातील महिला प्रतिमा' या दोन दिवसीय राज्यस्तरीय चर्चासत्राच्या उद्घाटनप्रसंगी ते बीजभाषक म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी पुणे विद्यापीठ संवादशास्त्र विभागाचे डॉ. विश्राम ढोले होते.

डॉ. लंगरे म्हणाले, बेनेगल यांच्या चित्रपटांतील महिलांच्या व्यक्तिरेखा विचार करण्यास प्रवृत्त करणाऱ्या असून, स्त्री समस्या त्यांनी स्त्रियांच्याच दृष्टिकोनातून मांडल्या..

डॉ. विश्राम ढोले म्हणाले की, श्याम बेनेगल यांचे चित्रपट म्हणजे व्यावसायिक व समांतर अशा दोन प्रवाहांना जोडणारा महत्त्वाचा दुवा आहेत. डॉ. निशा मुडे-पवार यांनी प्रास्ताविक केले. सर्फराज मुल्ला यांनी मार्गदर्शन केले. अश्विनी कांबळे यांनी आभार मानले. याप्रसंगी नांदेड विद्यापीठाचे डॉ. राजेंद्र गोणारकर, डॉ. विशाखा गारखेडकर, डॉ. प्रसाद ठाकूर, डॉ. चेतना सोनकांबळे, डॉ. शिवाजी जाधव, आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
08 FEB 2025
तरुण भारत

# अर्थसंकल्प जगाला दखल घ्यायला लावणारा

प्रतिनिधी
कोल्हापूर

■ डॉ. केदार मारूलकर

केंद्र सरकारने चालू आर्थिक वर्षासाठी सादर केलेला केंद्रीय अर्थसंकल्प हा जगाला दखल घ्यायला लावणारा आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठ वाणिज्य अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. केदार मारुलकर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रातील वाणिज्य विषयांतर्गत 'केंद्रीय अर्थसंकल्प २०२५' विषयावर आयोजित विशेष ऑनलाईन व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रभारी संचालक डॉ. कृष्णा पाटील होते. उपकुलसचिव व्ही. बी. शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. मारुलकर म्हणाले, भारतीय अर्थसंकल्पावर अमेरिकन व भू-राजकीय अर्थव्यवस्थेचा परिणाम झालेला दिसून येतो. व्यक्तीगत आर्थिक कर कमी करुन नव्या उत्पादनासाठी पैसा वापरण्यावर भर आहे. स्टार्टअपसाठी आर्थिक मदत वाढवून देण्यावर भर देण्यात आला आहे. कृत्रिम बुद्धीमत्ता एआय क्षेत्रात गुंतवणूक वाढवून जगातील तिसरा देश बनण्याचा हेतू दिसतो.

डॉ. पाटील म्हणाले, अर्थसंकल्पातून देशाच्या पुढील पाच वर्षाच्या आर्थिक धोरणांचे प्रतिबिंब उमटले आहे. कार्यशाळेसाठी ३५० हून अधिक विद्यार्थी व शिक्षक ऑनलाईन पद्धतीने उपस्थित होते. डॉ. प्रसाद दावणे यांनी स्वागत केले. डॉ. सुशांत माने यांनी पाहुण्यांची ओळख करुन दिली. डॉ. नितीन रणदिवे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. संजय चोपडे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
08 FEB 2025

तरुण भारत

# पीएम उषा योजनेसंदर्भातील कार्यशाळा उत्साहात

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या विधी अधिविभामध्ये प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियान (PM USHA) या योजनेअंतर्गत ``Value Added Course on Judicial Examination Training`` या विषयावरील आधारित कार्यशाळा उत्साहात झाली. न्यायाधीश शरद मडके यांच्या हस्ते आणि डॉ. एम. एस. देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात झाले. न्यायाधीश मडके यांनी उत्तम न्यायाधीश कसे बनावे व त्यांनी कशा प्रकारे न्यायदान केले पाहिजे याबद्दल मार्गदर्शन केले. न्यायाधीश व इतर परीक्षांची तयारी करण्यासाठी अनेक उपाय योजना सांगितल्या. त्यांनी न्यायाधीश होण्यासाठी पात्रतेपासून ते परीक्षेचे अनेक टप्पे यशस्वीपणे पार कसे करावे यांचे मार्गदर्शन विध्यार्थ्यांना केले. डॉ. देशमुख यांनी शिवाजी विद्यापीठाने राबवलेल्या अनेक योजनांचे फायदे यावर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाची सांगता डॉ. वी. व्हाय. धुपदाळे यांनी केली. सरकारी वकील सुर्यकांत मिरजे यांनी निकाल जाहीर करत असताना न्यायाधीश यांनी कोणती काळजी घेतली पाहिजे याबद्दल त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. न्यायाधीश एस. पी. कुलकर्णी, कोल्हापूर न्यायालयातील वरिष्ठ फौजदारी वकील गिरीश नाईक यांनी मार्गदर्शन विद्यार्थ्यांना केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
08 FEB 2025
पुण्यनगरी

# घरंदाज गायकीने रसिक मंत्रमुग्ध

## राजर्षी शाहू संगीत रजनी

**कोल्हापूर :** मनावर खोलवर परिणाम करणारे सूर, रसिकांवर मोहिनी घालणाऱ्या घरंदाज गायकीच्या छटा आणि शास्त्रीय गायनातील विविध प्रकारांमुळे रसिकांची मने चिंब झाली, राम गणेश गडकरी हॉल येथे झालेल्या या संगीत मैफलीने.

विद्यापीठाच्या संगीत-नाट्यशास्त्र विभागाच्या वतीने राम गणेश गडकरी हॉल येथे आयोजित राजर्षी शाहू संगीत रजनी या मैफलीचे उद्घाटन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते झाले. यावेळी प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, पं. विनोद डिग्रजकर, मीना लोहिया, विनोद लोहिया, प्रभाकर हेरवाडे यांची उपस्थिती होती. स्वागत डॉ. विनोद ठाकूरदेसाई यांनी केले. पहिल्या सत्राची सुरुवात ग्वाल्हेर घराण्याच्या गायिका चिन्मयी आठले-ओक यांच्या बहारदार गायकीने झाली. त्यांना संगीत साथ वंदना आठल्ये, रचन बोडस, शाश्वती मंडल यांनी दिली. दुसऱ्या सत्रात संवादिनीवादक पं. सुधीर नायक यांनी राग बिहायमधील ताल झपताल व तीन तालातील रचना सादर केल्या. यावेळी अरुण कुलकर्णी, सुधीर पोटे, शीतल धर्माधिकारी, राजप्रसाद धर्माधिकारी, सुचित्रा मोर्डेकर, डॉ. ज. ल. नागावकर उपस्थित होते.